**L. A. BILL No. XXXI OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५८ चा ६०.

२०२४ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४, रोजी महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंच्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) यास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— (१९५८ चा ६०.)

(१) अनुच्छेद ४ मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) अनुच्छेद ५ मध्ये, खंड (ह) मधील, उप-खंड (ब) मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) अनुच्छेद ८ मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) अनुच्छेद ९ मध्ये, स्तंभ (२) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) अनुच्छेद १० मध्ये, स्तंभ (२) मधील, “५०,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भाग भांडवलावर ०.२ टक्के ” या मजकुराऐवजी, “एक कोटी रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भाग भांडवलावर ०.३ टक्के ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(६) अनुच्छेद १२ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

“ **१२. निवाडा,** म्हणजे, दावा चालू असताना, न्यायालयाच्या आदेशाव्यतिरिक्त अन्यथा केलेल्या निर्देशावर, विद्यमान किंवा भावी विवाद लवादाकडे सादर करण्या-विषयीच्या लेखी करारनाम्याच्या परिणामी दिलेला निवाडा असणारा, परंतु, वाटणीचा निदेश देणारा निवाडा नसणारा,–

| | |
|---|---|
| (अ) स्थावर मालमत्तेशी संबंधित असणारा ; | अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अभिहस्तांतरणपत्रावर जे आकारण्यायोग्य असेल तितके शुल्क. |
| (ब) (एक) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत; | निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.७५ टक्के. |
| (दोन) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत ; | रुपये सदतीस हजार पाचशे *अधिक* निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.५ टक्के. |
| (तीन) जेव्हा, निवाड्यामध्ये दिलेली रक्कम, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, | रुपये दोन लाख बासष्ट हजार पाचशे *अधिक* निवाड्यामध्ये दिलेल्या रकमेच्या ०.२५ टक्के.”**;** |

जंगम मालमत्तेशी संबंधित असणारा, लवादाने किंवा पंचाने दिलेला कोणताही लेखी निर्णय, होय,

(७) अनुच्छेद २७ मध्ये, स्तंभ (२) मधील, “ शंभर रुपयांच्या ” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपयांच्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(८) अनुच्छेद ३० मध्ये, स्तंभ (२) मधील, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(९) अनुच्छेद ३८ मध्ये, स्तंभ (२) मधील, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१०) अनुच्छेद ४४ मध्ये, स्तंभ (२) मधील, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(११) अनुच्छेद ४७ मध्ये, खंड (१) मधील, उपखंड (ब) मध्ये, स्तंभ (२) मधील, “ पंधरा हजार ” या मजकुराऐवजी, “ पन्नास हजार ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१२) अनुच्छेद ४९ मध्ये, स्तंभ (२) मधील, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१३) अनुच्छेद ५० मध्ये, स्तंभ (२) मधील, “ शंभर रुपये ” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१४) अनुच्छेद ५२ मध्ये, खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, “ दोनशे रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१५) अनुच्छेद ५८ मध्ये, खंड (अ) मधील, स्तंभ (२) मध्ये, “ दोनशे रुपये ” या मजकुराऐवजी, “ पाचशे रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(१६) अनुच्छेद ६३ मध्ये,—

(एक) खंड (अ) मधील, स्तंभ (१) मध्ये, “ दहा लाख ” या मजकुराऐवजी, “पाच लाख” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील,—

(क) स्तंभ (१) मध्ये, “ दहा लाख ” या मजकुराऐवजी, “ पाच लाख ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) स्तंभ (२) मध्ये, “ दहा लाख रुपयांवरील रकमेच्या ०.१ टक्के ” या मजकुराऐवजी, “ पाच लाख रुपयांवरील रकमेच्या ०.३ टक्के ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२४ चा महा. अध्या. १२.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुद्रांक शुल्क बसविण्यात सुलभता व एकरुपता आणण्याच्या आणि शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यास जोडलेल्या अनुसूची एक च्या विवक्षित अनुच्छेदांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

२. उक्त अधिनियमातील सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) अनुच्छेद ४,५,८,९,२७,३०,३८,४४,४९,५०,५२, व ५८ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित संलेखांवरील शंभर रुपये किंवा दोनशे रुपये इतक्या नाममात्र रकमेतील दीर्घ काळापूर्वी निश्चित केलेल्या मुद्रांक शुल्कांच्या दरात पाचशे रुपयेइतकी वाढ करणे ;

(दोन) अनुच्छेद १० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कंपनी संस्थापन नियमावलीच्या संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या दरात व मुद्रांक शुल्काच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे ;

(तीन) अनुच्छेद १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लवादाने दिलेल्या निवाड्याच्या संलेखावरील मुद्रांक शुल्कांच्या दरात वाढ करणे ;

(चार) जेव्हा अनुच्छेद ४७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रोख रकमेच्या स्वरुपात आणलेला अंशदानाचा हिस्सा, ५०,००० रुपयांहून अधिक असेल त्याबाबतीत, भागीदारीच्या संलेखावरील मुद्रांक शुल्कांच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे ;

(पाच) अनुच्छेद ६३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यकंत्राटाच्या संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या दरात व मुद्रांक शुल्काच्या दराच्या कमाल मर्यादेत वाढ करणे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. १२), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १५ डिसेंबर, २०२४.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वित्तीय ज्ञापन

मुद्रांक शुल्क बसविण्यात सुलभता व एकरुपता आणण्याच्या आणि शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यास जोडलेल्या अनुसूची एक च्या अनुच्छेदांमध्ये विवक्षित सुधारणा केल्या आहेत.

हे विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, त्यात राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती खर्च अथवा अनावर्ती खर्च अंतर्भूत असेल अशी कोणतीही तरतूद या विधेयकात करण्यात आलेली नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ पुर:स्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेत शिफारस करीत आहेत.

**सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ३१—महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४**

**(महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ यातील उतारे)**

**(सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०)**

**१.** ते **७६.** XX XX XX

**अनुसूची एक**

**संलेखांवरील मुद्रांक शुल्क**

(कलम ३ पहा)

| संलेखाचे वर्णन | उचित मुद्रांक शुल्क |
|---|---|
| **(१)** | **(२)** |
| **१.** ते **३.** XX XX | XX |
| **४. प्रतिज्ञालेख** म्हणजे, एखादे लेखी निवेदन वस्तुस्थितिकथन असल्याचे दिसत असून ते करणा-या व्यक्तीने ते स्वाक्षरित केलेल असेल आणि तिने शपथेवर अथवा शपथग्रहणाच्याऐवजी दृढकथन अथवा अभिकथन करण्यास कायद्याद्वारे मुभा मिळालेल्या व्यक्तींनी दृढकथनाद्वारे त्यास पुष्टी दिलेली असेल असे निवेदन. | शंभर रुपये |

**माफी**

**प्रतिज्ञालेख किंवा लेखी अधिकथन जेव्हा ते,—**

(क) वायुसेना अधिनियम, १९५०, भूसेना अधिनियम, १९५० किंवा नौसेना अधिनियम, १९५७ यांखाली नावनोंदणीची शर्त म्हणून;

(ख) कोणत्याही न्यायलयात किंवा कोणत्याही न्यायलयाच्या अधिका-यापुढे दाखल करावयाच्या किंवा उपयोगात आणावयाच्या तात्कालिक प्रयोजनांसाठी; किंवा

(ग) कोणत्याही व्यक्तीला कोणतेही निवृत्तीवेतन किंवा धर्मादाय भत्ता घेणे शक्य व्हावे या एकमात्र प्रयोजनासाठी, केलेले असेल तेव्हा.

**५. करार किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेपलेख,—**

| | |
|---|---|
| **(क)** ते **(ह)(अ)** XX XX | XX |
| **(ख)** अन्यथा तरतूद केलेली नसेल तर,— | शंभर रुपये |

**स्पष्टीकरण.—**अनुच्छेद ५१-अ अन्वये उचित शुल्क भरले असेल तर या अनुच्छेदाच्या उप-खंड (ख) आणि (ग) खाली समाविष्ट केलेले करार किंवा त्यांचा अभिलेख यांवर कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

**६.** व **७.** XX XX XX

| | |
|---|---|
| **८. मूल्यन किंवा मूल्यांकन—** दाव्याच्या ओघात न्यायालयाने दिलेल्या आदेशा-खाली नव्हे तर अन्यथा केलेले. | शंभर रुपये |

**माफी**

(अ) केवळ एकाच पक्षकाराच्या माहितीसाठी केलेले आणि एकतर करारामुळे किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे कोणत्याही रीतीने पक्षकारांमध्ये बंधनकारक नसणारे मूल्यन किंवा मूल्यांकन;

(ब) एखाद्या जमीन मालकाला खंड म्हणून द्यावयाची रक्कम निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी केलेले पिकाचे मूल्यन.

| | |
|---|---|
| **९. शिकाऊ उमेदवारी -** विलेख. - यामध्ये कोणताही पेशा, उदीम किंवा कामधंदा शिकण्याकरिता कोणत्याही मालकाकडे ठेवलेल्या शिकाऊ उमेदवाराच्या, लिपिकाच्या किंवा नोकराच्या नोकरीसंबंधीचा किंवा शिकवणी संबंधीचा, व्यवसाय उमेदवारी कराराहून (अनुच्छेद ११) अन्य असा प्रत्येक लेख समाविष्ट आहे. | शंभर रुपये |

**माफी**

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ खाली निष्पादित करून दिलेला किंवा ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीस सार्वजनिक धर्मादाय संस्थेने किंवा तिच्या खर्चाने शिकाऊ उमेदवारीसाठी ठेवलेला असेल असा कोणत्याही शिकाऊ उमेदवारी-संबंधीचा संलेख.

| | |
|---|---|
| **१०. एखाद्या कंपनीची संस्थापन नियमावली,—** जेव्हा कंपनीचे कोणतेही भागभांडवल; किंवा नाममात्र भागभांडवल किंवा वाढीव भागभांडवल नसेल तेव्हा; | ५०,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, भाग भांडवलावर किंवा, यथास्थिती, वाढीव भागभांडवलावर ०.२ टक्के |

**माफी**

नफ्याकरिता स्थापन न केलेल्या व कंपनी अधिनियम १९५६ याच्या कलम २५ खाली नोंदणी झालेल्या कोणत्याही अधिसंघाची नियमावली (कंपनीच्या संस्थापन समयलेख (अनुच्छेद ३९) देखील पहावा.)

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | XX | XX | XX |

| | |
|---|---|
| **१२. निवाडा. -** म्हणजे एखादा वाद चालू असताना न्यायलयाच्या आदेशाखेरीज अन्यथा निर्देश केल्यावर लवादाकडे विद्यमान किंवा भावी मतभेद दाखल करण्याविषीच्या लेखी करारानुसार केलेला असेल असा, परंतु वाटणीचा निदेश देण्याबाबतचा निवाडा असेल असा, लवादाने किंवा पंचाने दिलेला कोणताही लेखी निर्णय. | पाचशे रुपये |

| | | | |
|---|---|---|---|
| **१३.** ते **२६.** | XX | XX | XX |

| | |
|---|---|
| **२७. प्रतिलेख किंवा प्रतिलिपी.-** शुल्क आकारण्यास पात्र अशा संलेखाचा आणि ज्याच्या संबंधात योग्य शुल्क भरलेले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिलेख किंवा त्याची प्रतिलिपी. | शंभर रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, मूळ संलेखावर देय असलेल्या शुल्काएवढे शुल्क. |

| | | | |
|---|---|---|---|
| **२८.** आणि **२९.** | XX | XX | XX |

**३०. घटस्फोट.–** यासंबंधीचा संलेख म्हणजे, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एखादी व्यक्ती आपल्या विवाहाचा विच्छेद करते असा संलेख. — शंभर रुपये

**विधवादाय.—**यासंबंधीचा संलेख, संव्यवस्था (अनुच्छेद ५५) पहा.

**प्रतिलिपि.-** प्रतिलेख (अनुच्छेद २७) पहा.

| | | | |
|---|---|---|---|
| **३१.** ते **३७.** | XX | XX | XX |

**३८. लायसनपत्र.-** म्हणजे, धनको आपल्या हक्कमागण्या विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत तहकूब ठेवील व ऋणकोला त्याच्या स्वविवेकानुसार व्यवहार चालू ठेवण्यास मुभा देईल असा, ऋणको व त्याचा धनको यांच्या दरम्यान झालेला कोणताही करार. — शंभर रुपये

| | | | |
|---|---|---|---|
| **३९.** ते **४३.** | XX | XX | XX |

**४४. नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयी अधिटिप्पणी.-** नौकाधिपतीचे अधिकथन (अनुच्छेद ५०) देखील पहा. — शंभर रुपये

| | | | |
|---|---|---|---|
| **४५. ते ४६.** | XX | XX | XX |

**४७. भागीदारी.-**

(१) नफा मिळविण्यासाठी व नफ्याच्या हिश्श्यासाठी मग तो रोख रकमेच्या स्वरुपात असो किंवा वस्तूच्या स्वरुपात असो, एखादा व्यवसाय चालविणारी मर्यादित दयित्व असलेली भागीदारी व संयुक्त उपक्रम यांच्यासह कोणत्याही भागीदारीचा संलेख.–

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | XX | XX | XX |

(ब) रोख रकमेच्या स्वरुपात आणलेल्या अशा अंशदानाचा हिस्सा ५०,००० रुपयांहून अधिक असेल त्याबाबतील, — अंशदानाच्या रकमेच्या एक टक्का पंधरा हजार रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून.

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | XX | XX | XX |
| (२) | XX | XX | XX |
| **४८.** | XX | XX | XX |

**४९. विनिमयपत्र किंवा वचनचिट्ठी याबाबतचे प्रतिसाक्षन.-** म्हणजे, लेखप्रमाणकाने किंवा कायदेशीरपणे लेखप्रमाणक म्हणून काम करणा-या इतर व्यक्तीने विनिमयपत्राचा किंवा वचनचिठ्ठीचा अवमान झाल्याचे साक्षांकित करण्यासाठी केलेले कोणतेही लेखी अधिकथन. — शंभर रुपये

**५०. नौकाधिपतीचे अधिकथन.-** म्हणजे, तोट्यांचे समायोजन किंवा हानिसरासरींची परिगणना करण्याच्या दृष्टीने जहाजच्या सफरींच्या तपशिलासंबंधी नौकाधिपतीने लिहून दिलेले कोणतेही अधिकथन आणि जहाजावर माल न चढविण्याबद्दल किंवा जहाजातून तो न उतरवण्याबद्दल जहाज भाड्याने घेणा-या किंवा माल प्रेषिती व्यक्तीविरुद्ध त्याने लेखी केलेले अधिकथन, लेखप्रमाणकाने किंवा कायदेशीरपणे लेखप्रमाणक म्हणून काम करणा-या इतर व्यक्तीने साक्षांकित किंवा प्रमाणित केले असेल तेव्हा, असे प्रत्येक अधिकथन. — शंभर रुपये

नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयी अधिटिप्पणी देखील (
अनुच्छेद ४४ पहा).

**५१.** आणि **५१-अ.** XX XX XX

**५२. परिमोचनपत्र.—**म्हणजे, ज्या संलेखाद्वारे (ज्याविषयी, कलम २४ मध्ये तरतूद केली आहे असा संलेख नसणारा) एखादी व्यक्ती अन्य व्यक्तीसाठी किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट मालमत्तेवरील हक्कमागणी सोडून देते असा कोणताही संलेख,— दोनशे रुपये

(अ) जर वडिलोपार्जित मालमत्ता किंवा तिचा भाग यासंबंधातील परिमोचनपत्र, भाऊ किंवा बहीण (हक्क सोडून दिलेल्या व्यक्तीच्या आईवडिलांची मुले) अथवा मुलगा किंवा मुलगी अथवा पूर्वी मरण पावलेल्या मुलाचा मुलगा अथवा पूर्वी मरण पावलेल्या मुलाची मुलगी अथवा हक्क सोडून दिलेल्या व्यक्तीचे वडील किंवा आई अथवा पती/पत्नी किंवा वरीलपैकी नातेसंबंध असणा-या व्यक्तीचे कायदेशीर वारस यांनी किंवा त्यांच्यावतीने निष्पादित केले असेल तर,

(ब) XX XX XX

**५३.** ते **५७.** XX XX XX

**५८. भाडेपट्ट्याच्या प्रत्यर्पणाच्या करारासह भाडेपट्ट्याच्या प्रत्यर्पण लेख.—**

(अ) कोणत्याही मोबदल्याशिवाय दोनशे रुपये ;

(ब) XX XX XX

**५९.** ते **६२.** XX XX XX

**६३. कार्यकंत्राट.—**म्हणजे, कामांचे आणि ती पार पडताना लागणा-या कामगारांसाठीचे सेवांचे कंत्राट असून त्यात मालाच्या स्वरुपातील मालमत्तेचे हस्तांतरण (मग ते मालाचे म्हणून असो किंवा अन्य काही स्वरूपातील असो) करण्यासाठी असलेली सेवा आणि त्यात उपकंत्राटाचा समावेश होतो,—

(अ) अशा कंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम किंवा मूल्य दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, पाचशे रुपये

(ब) ते दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, पंचवीस लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधिन राहून, पाचशे रुपये अधिक दहा लाख रुपयांवरील रकमेच्या ०.१ टक्के.

**अनुसूची दोन** XX XX XX

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१.]**

**[महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**[विधानसभेने दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.